**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**
==============================================================
**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**
**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**

# महानुभाव साहित्याची विश्वात्मकता

**प.पु.प.म.श्री.उपाध्य कुळाचार्य**
**श्रीवर्धनस्थ बीडकर बाबाजी ( संचालक:- महानुभाव प्रणवाश्रम, रणाईचे)**

**प्रस्तावना :-**

यादवांच्या काळात महानुभाव संप्रदाय उदयास आला. महानुभाव साहित्य हे सर्वांगीण मानवता धर्माचे प्रतीक आहे. महानुभावांची विश्वात्मकता हे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या लीळाचरित्रातून तसेच त्यांच्या विचारांचा वारसा ज्या श्रुती, स्मृती ,वृद्धाचार , मार्गरुढी, आणि वर्तमान जीवन प्रगट होते. स्वामींची दृष्टी समस्त जीवांसाठी समानतेची होती. स्वामिनी समाजासमोर अनेक दृष्टांत देऊन आपली विचारधारा नैतिक मूल्यावर कशी स्थिर आहे हे समाजाला दाखवून दिले.

बाराव्या शतकाचा विचार केला असता असे आपल्याला लक्षात येते. की, या काळात महाराष्ट्रात यादवांची सत्ता होती. याच काळात महानुभाव संप्रदाय समाजात प्रसारित झालेला होता. या संप्रदायाचे प्रवर्तक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांनी आपल्या अमृतवाणीतून समाजाला अनमोल संदेश दिला. सूत्रपाठ हा महानुभावांचा वेदग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात स्वामींच्या वेळी समाजातील अवस्था विस्कळीत झालेली होती. समाजाला एकत्र आणण्याचे काम महानुभाव पंथाने केलेले आहे. स्वामींची समाजाबद्दल व्यापकदृष्टी होती. बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात एक मानवतावादी, समतावादी, स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची शिकवण देणाऱ्या या संप्रदायाने मुहूर्तमेढ रोवली.ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

**सर्वज्ञ श्री चक्रधरांची सन्मानतत्व :-**

सर्वसामान्य माणसांना धार्मिक अधिकार शून्य होते .धर्मावर वरच्या वर्गाचा पगडा होता. जातिभेद व स्पृश्यअस्पृश्यताकठोरपणे पाळली जात होती. लीळाचरित्रातील चर्मकाराचे उदाहरण घेण्यासारखे आहे. या सर्व अंधाकारातून सर्वसामान्य माणसांना मुक्त करण्याचा मार्ग श्री चक्रधरांनी निवडला. स्वामींनी संस्कृत भाषेचे वाढलेली स्तोम कमी केले, आणि सामान्यांच्या भाषेत त्यांच्या बोलीत त्यांनी धर्मातत्वे समजून सांगितली. समानतेचा संदेश देणारी एक लीळा आहे . श्री चक्रधर स्वामी एका मंदिरात बसलेले होते. त्यांना सतत भक्ती जणांना निरूपण अथवा उपदेश करण्याचे व्यसन होते. ज्या वेळेला प्रवृत्ती झाली त्या वेळेला ते आपल्या भक्तांना उपदेश करत असत.

एकदा असाच प्रसंग उपदेश सुरू असताना एका शिष्याने स्वामींजवळ निरोप आणला.की, मंदिराच्या बाहेर तीन मातंग उभे आहेत. त्यांना आपले दर्शन हवे आहे. निरोपण सुरू असल्यामुळे स्वामींनी आपल्या बाजूच्या परडीतील (टोपली) तीन लाडू त्या मातंगांना प्रसाद म्हणून देण्यास सांगितले. आणि निरूपण सुरू केले परंतु त्यावर मातंगाचे समाधान झाले नाही. मातंगांना स्वामींचे दर्शन घ्यायचे होते शिष्याने परत येऊन सांगितले त्यांना आपले दर्शन हवे आहे. हे ऐकून स्वामी निरूपण करताना स्वतः उठले आणि मंदिराच्या बाहेर आले. स्वामींचे दिव्य दर्शन होताच मातंगांनी स्वामींना दंडवते घातली. मातंगांजवळ स्वामींना देण्यासाठी

काहीच नसल्यामुळे मातंगांना स्वामींनी दिलेला लाडू त्यांनी परत स्वामींनाच अर्पण केला. लाडू घेतल्यानंतर स्वामींनी वळून आपल्या शिष्याकडे पाहत "**हा प्रसाद घ्याल** "असे म्हटले . त्यानंतर स्वामी दिलेला प्रसाद शिष्यांना अमृताहु नीगोड वाटला. या घटनेला साक्षीदार असलेले कर्मठ मात्र दुखावले गेले. स्वामींनी न घाबरता जातीभेदाचे मूळ उपटण्याचे अभियान सुरू केले.

**सांस्कृतिकदृष्ट्या व्यापकता:-**

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी सांस्कृतिक पुरस्कर्ते म्हटले तर वावघे ठरणार नाही. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विचारांचा परामर्श घेता असे आपल्या लक्षात येईल की, एकदा स्वामी रांजणगावी मुक्कामाला असताना दादोस आणि रामदेव स्वामींचे शिष्य त्या ठिकाणी होते. प्रसंग असा होता कि, रात्री झोपताना त्यांना अचानक तहान लागते तेव्हा दादोस घागरी जवळ पाणी घेण्यासाठी येतात परंतु त्यात पाणीच नसते म्हणून ते रागाने घागरी जोरात खाली फेकून देतात. तेव्हा राणाईसा जागी होते आणि लक्षात येते की , दादोसांना तहान लागली आहे तेव्हा ती मध्यरात्री उठून घागर घेऊन पाणी आणण्यासाठी जाते.

या प्रसंगाचे यथावृत्त सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी स्वतः जाणतात. आणि आपला दुसरा शिष्य नाथोबा यास म्हणतात, **"नाथो आपल्यासाठी पाणी घेऊन या"** तेव्हा नाथोबा घागरी जवळ जातात तेव्हा त्यांना तिथे अर्धीच घागर भरलेली दिसते म्हणून नाथोबा स्वतः घागर घेऊन पाणी आणण्यासाठी विहिरीकडे जातात. त्या ठिकाणी पाणी आणण्यासाठी गेलेली स्त्री त्यांना दिसते. ते बघून नाथोबा म्हणतात, **"कैसे आमचे गोसावी आपले ऐश्वर्य लोपिती"** म्हणजे स्वामींनी या स्त्रीची मदत करण्यासाठी मला पाठवलं तर पाणी आणण्यासाठी नाही हा मुख्य उद्देश होता. या प्रसंगाद्वारे असे सिद्ध होते की, स्त्रीरक्षण भूमिका बाराव्या शतकातही अस्तित्वात होती. यावरुन म्हणजेच **"स्वयं दास्य तपस्वीनाम्"** याची शिकवण महानुभाव साहित्यात पहावयास मिळते.

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी व त्यांच्या अनुयायांनी निर्माण केलेला भक्ती मार्गाचा उत्सव पुढील काळासाठी मेळाव्यासारखा समाजभर पसरत गेला. व त्यांचे विचार आणि आचारप्रणालीने जगाच्या पाठीवर अमुलाग्र असे बदल केले . मराठी भाषेचा अट्टाहास धरून सहा हजार ग्रंथ निर्माण करणारा हा संप्रदाय महाराष्ट्राचे संचित आहे .ही महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे.

**सामाजिक दृष्टीने आकलन:-**

बाराव्या शतकातील सर्व साहित्य हे धर्मप्रधान व पंथनिष्ठ निर्माण झालेले साहित्य असले तरी या साहित्याचे सामाजिक अंग उपेक्षणीय आहे. महानुभाव साहित्यात लीळाचरित्र श्री गोविंदप्रभूचरित्र व इतर साती ग्रंथ त्यांनी मराठी भाषेचा केलेला पुरस्कार, समतेची मानवतेची दिलेली शिकवण, जातीयता, कर्मकांड, अंधश्रद्धा, देवदेवतांची नाकारलेली भक्ती ही सर्वसामान्यांना न्याय देणारी आहे.

बहुजन समाजाची भाषा ही लोक भाषा मराठी आहे आणि या भाषा स्वीकारातून त्यांनी स्तर रचनेला एका समान पातळीवर आणले. श्री चक्रधर स्वामींचे हे सांस्कृतिक कार्य अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. महानुभावांच्या पंचकृष्णापैकी श्री चक्रधर तसेच त्यांचे गुरु श्री गोविंद प्रभू व चांगदेव चक्रपाणि हे कलयुगीचे अवतार आहेत असे पंथ मानतो. या तिन्ही अवतारांनी महाराष्ट्रात जो सामाजिक सुधारणेचा पायंडा पाडला त्याचे महत्त्व वादातीत आहे.

श्री चक्रधरांना सर्व जीव सारखे वाटतात म्हणून तर मांडीखाली आलेल्या सशाला ते अभय देतात व म्हणतात," **एथ शरण आलेया काई मरण असे**" हे सूत्र उच्चवर्णीयांची मक्तेदारी संपुष्टात आणणारे आहे सर्वांना एका समानपातळीवर आणून स्वामी श्री चक्रधरांनी या महाराष्ट्रात समतेचा पाया भरभक्कम केला.

**पुरोगामी तत्व प्रणाली :-**

आजच्या आधुनिक युगामध्ये विषय व्यवहारामध्ये भरकटलेल्या मनुष्याला शांत करण्यासाठी महानुभाव पंथाने जो निर्गुण विचार मांडला आहे. तो मनुष्याचे जीवन सदाचारी बनवू शकतो. महानुभावांचे विचार लौकिक आणि पारलौकिक विचार भिन्नतेपेक्षा वेगळे आहेत. आचाराचे वेगळेपण जपणारा पंथ म्हणून महानुभाव साहित्याची ओळख आहे. ज्या विचारांमुळे वीरमता प्राप्त होते, अष्टभोगाकडे मन वळले जाते." **मन हे वढाळ परधन कामिनी कडे धावे " .** अशा स्वैर मनाला शांत करण्यासाठी आजच्या काळाला महानुभाव पंथाच्या विचारांची गरज आहे **.** ज्यांनी हे विचार अंगीकारले त्यांच्या जीवनाचे सोने झाले . ज्याप्रमाणे परिसाने लोखंडाला स्पर्श केल्यानंतर ताे त्याचे सोने करतो. तसेच पंथीय विचार अविचारांना शुद्ध करणारे आहेत. महानुभावांची आचार तत्त्वप्रणाली यशस्वी जीवनाला गौरवता प्रदान करणारी आहे. या विचारांनी जनमाणसांचे जीवन सदाचारी व समृद्धहोते असे स्वामींनी त्या काळात समाजासमोर दाखवून दिले.

**लोकसंस्कृती दर्शन :-**

महानुभाव साहित्यात समकालीन लोकसंस्कृतीचे जोरकस प्रतिबिंब उमटलेले आहे. विशेषतः लीळाचरित्रासारख्या ग्रंथात यादवकालीन संस्कृतीचा ठसा उमटलेला आहे. लोकसंस्कृतीचे दुसरे नाव जणू लोकसाहित्य आहे असे म्हणण्याजागी परिस्थिती येथे लक्षात येते. लोकसंस्कृती म्हणजे लोकजीवन रीतीरिवाज प्रत्यक्ष जीवनात विद्यमान असलेल्या बाबीतून संस्कृतीची जडणघडण होत असते तत्कालीन समाज जीवनाचा बोध होतो. महानुभाव साहित्य आणि लोकांच्या सांस्कृतिक जीवनाला धार प्राप्त करून दिली. जनजाती एकत्र आणणाऱ्या पंचकृष्णाचे आदर्श लोकांपुढे या पंथांनी मांडले. याबद्दल भास्कर गिरीधारी म्हणतात,"**महानुभावीयांच्या उत्कृष्ट मराठीचे उदाहरण लोकसाहित्य सदृश्य पुढील वाक्यातून येऊ शकेल. डोंगर जळतात ते लोक पाहतात पण म्हणे जळतात ते कोणी पाहत नाही ."** अशाप्रकारे महानुभावांच्या साहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन दिसून येते. महानुभाव साहित्यामध्ये लोकसाहित्याचा प्रभाव आढळतो हे अभ्यासामधून महानुभाव कवीची समरसभावनात्मकतेची प्रचिती येते.

**उपसंहार :-**

अशाप्रकारे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे कार्य व्यापक स्वरूपाचे व आधुनिकतेला जोडून ठेवणारे आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाला या साहित्यामुळे गतिमानता आली असे म्हटले तर वागवे ठरणार नाही. अशाप्रकारे नव्या विचारांची देणगी देणाऱ्या आणि कर्मठ लोकांच्या विचारांचा नाश करत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी समाजात एकता, समानता, बंधुता , सामाजिकता ,मूल्ये तळागळापर्यंत रुजवली. आज यज्ञ, वैकल्य, वृत्त कालबाह्य झाली. हे सर्व समाजांनी मान्य केलेले विचार स्वामींनी बाराव्या शतकामध्ये समाजासमोर ठेवले. आणि त्या विचारांचा आज विजय झाला. आणि हाच खऱ्या अर्थाने पंथाचा हाच गौरव आहे. अशाप्रकारे

समानतेचे तत्व शिकवणाऱ्या आणि आणि जीवाचा उद्धार करणाऱ्या सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी साष्टांग दंडवत प्रणाम करतो.

**निष्कर्ष :-**

१) आज स्वीकारलेले सर्व मूल्ये स्वामींनी 12 व्या शतकात समाजापुढे ठेवले यातून स्वामींचा आधुनिक दृष्टिकोन लक्षात येतो.

२) स्त्री शिक्षणाचा आरंभ स्वामींनी बाराव्या शतकात समाजासमोर ठेवला. यावरून त्या काळात दिलेला स्त्रीला सन्मान लक्षात येतो.

३) स्वामींनी आपल्या लिळेमध्ये सशालाही **महात्मे हो** अशी हाक दिली यावरून जनसामान्यांबद्दलचा आदर व्यक्त होतो.

४) प्रतिकूल अवस्थेतही समता, बंधुता ,ही मूल्य स्वामींनी जनसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांना ज्ञानमार्ग दाखवून दिला.

**संदर्भसूची :-**

1) दैवयोग - रिद्धपूर प्रकाशन

2) जिज्ञासा - म. सोनपेठकर बाबा

3) मराठी तत्वकोश खंड -१ - देविदास वाडेकर

**महानुभाव साहित्याची विश्वात्मकता**

**प.पु.प.म.श्री.उपाध्य कुळाचार्य**